आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बौद्ध धर्माचा मध्यवर्ती संदेश शांतता आणि अहिंसेवर केंद्रित असून, आज जगाला करुणेची गरज आहे, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेत भारत ब्रँड आटा आणि तांदूळ वाटपाच्या दुसऱ्या टप्प्याला प्रारंभ
- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात
- शरद पवार यांचे सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत

**आणि**

- अमेरिकेत आज अध्यक्षीय निवडणुकीसाठी मतदान

**<><><><><>**

भारताला प्रत्येक युगात थोर मार्गदर्शक लाभले असून, यामध्ये भगवान गौतम बुद्धांचं स्थान अढळ आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्ली इथं आयोजित पहिल्या आशियाई बौद्ध परिषदेला संबोधित करत होत्या. सिद्धार्थ गौतम यांना बोधगया इथं बोधी वृक्षाखाली झालेली ज्ञानप्राप्ती, ही इतिहासातली असामान्य घटना असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

जग आज विविध आघाड्यांवर अस्तित्वासाठी झगडत असताना, बौद्ध समुदायाकडे मानवाला देण्यासारखं खूप काही आहे, असं त्या म्हणाल्या. बौद्ध धर्माचा मध्यवर्ती संदेश शांतता आणि अहिंसेवर केंद्रित असून, आज  जगाला करुणेची गरज आहे, असं त्या म्हणाल्या.

जगभरात ज्याचा प्रसार झाला आहे, त्या बौद्ध धर्माचा सन्मान करण्यासाठी सांस्कृतिक मंत्रालयानं आंतरराष्ट्रीय बौद्ध महासंघाच्या सहकार्यानं ही दोन दिवसीय परिषद आयोजित केली आहे. ‘आशियाला बळकट करण्यात बौद्ध धम्माची भूमिका’, ही या परिषदेची संकल्पना आहे.

**<><><><><>**

कॅनडामध्ये काल ओंटारियोमधल्या ब्रॅम्प्टन इथं हिंदू मंदिरात दहशतवादी आणि फुटीरतावाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अशा हल्ल्याद्वारे कॅनडातील भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांना घाबरवण्याचा प्रयत्न करणे हा भ्याडपणा आहे. अशा घटनांमुळे भारताचा संकल्प अजिबात ढळणार नाही. असं त्यांनी समाज माध्यमाद्वारे प्रसिद्ध केलेल्या आपल्या संदेशात म्हटल आहे. कॅनडा सरकारने देशात कायदा सुव्यवस्था राहील याची काळजी घ्यावी आणि या हल्ल्याबाबत योग्य कारवाई करावी असही प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटल आहे.

दरम्यान या हल्ल्याच्या निषेधार्थ कॅनडातल्या भारतीय समुदायाने काल निदर्शनं केली.

**<><><><><>**

कॅनडामधला हिंदू मंदिरावरचा हल्ला, ही चिंतेची बाब असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज ऑस्ट्रेलियामध्ये कॅनबेरा इथं १५ व्या भारत-ऑस्ट्रेलिया परराष्ट्र मंत्री स्तरावरच्या संवादानंतर आयोजित संयुक्त वार्ताहर परिषदेत बोलत होते. कॅनडामध्ये अतिरेकी शक्तींना राजकीय आश्रय दिला जात आहे, याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. कॅनडानं कोणतंही स्पष्टीकरण न देता

आरोप करण्याची पद्धत अवलंबली  असून, भारतीय  अधिकाऱ्यांवर पाळत ठेवण्याचं त्यांचं धोरण, हे पूर्णपणे अस्वीकारार्ह असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या १५ व्या परराष्ट्र मंत्री स्तरावरच्या संवादा मध्ये, दोन्ही बाजूंनी भारत आणि ऑस्ट्रेलियाचे शेजारी देश,  हिंद-प्रशांत महासागर क्षेत्र, पश्चिम आशिया, युक्रेन आणि जागतिक धोरणात्मक स्थितीवर चर्चा केली. भारत-ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी सातत्यानं वृद्धिंगत होत असून, मजबूत राजकीय संबंध, गतिशील संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य, वाढत असलेला व्यापार, आणि खोलवर रुजत असलेल्या शैक्षणिक संबंधांमधून हे स्पष्ट होत असल्याचं डॉ. जयशंकर यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये  म्हटलं आहे.

**<><><><>**

सर्व प्रकारची खासगी मालमत्ता समाजाची साधनसामुग्री मानून संविधानाच्या कलम ३९ बी अन्वये तिचं फेरवाटप करता येणार नाही, मात्र काही प्रकारची खासगी संपत्ती समाजाच्या हिताकरता अधिग्रहित करता येईल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालच्या  ९ न्यायमूर्तींच्या  संविधान पीठानं  आज हा निर्णय दिला. सरन्यायाधीशांसह ६ न्यायाधीशांनी असा निर्णय दिला असून न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी अंशतः सहमती दिली आहे, तर न्यायमूर्ती सुधांशु धुलिया यांनी मतभेद नोंदवला आहे.

**<><><><>**

दिल्लीत भारत ब्रँड आटा आणि तांदळाच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन आज ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते

झालं. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा यासाठी सरकारनं हे पाऊल उचलल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत ब्रँड आटा ३० रुपये किलो आणि भारत ब्रँड तांदूळ ३४ रुपये किलो दराने उपलब्ध आहे. भारत ब्रँड पदार्थांच्या विक्रीमुळे या गरजेच्या खाद्यपदार्थांच्या किमती कमी होण्यास मदत होईल असही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

झारखंड मध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला जोर आला असून विविध पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. हेमंत सोरेन सरकारनं झारखंड मधल्या जनतेची फसवणूक केली असल्याची टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल झारखंड मधल्या गढवा इथं केली. ते आसामचे मुख्यमंत्री आणि भाजपचे झारखंड चे प्रभारी हेमंत बिसवा सरमा यांनी मतांसाठी मुख्यमंत्री हेमंत सोरेन बांग्लादेशी घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप केला. तर २०१९ मध्ये भाजपने आपल्या सरकार विरुद्ध कट रचल्याचा आरोप मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी केला.

दरम्यान आज रांची आणि लोहरदग्गा इथ संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची प्रचार सभा होत आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याही प्रचार सभा होणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीचं चित्र स्पष्ट झालं आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार १४० उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातल्या २८८ मतदारसंघात ७ हजार ७८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले

होते; उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत २ हजार ९३८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. अनेक मतदार संघातली बंडखोरी रोखण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आलं आहे; त्याचवेळी अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवारांनी आपले अर्ज कायम ठेवल्याने तिथे चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मित्रपक्षांचे उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असल्याने प्रचाराच्या बाबतीत संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे.

भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री आणि दक्षिण पश्चिम नागपूरचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रचाराचा नारळ फोडला. त्यांनी आज जनसंपर्क रॅलीच्या मध्यमातून पेट्रोल पंप चौक हिंगणा नाका इथून प्रचाराला सुरवात केली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सभा आज यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि राळेगाव मतदारसंघातील उमेदवारांसाठी होणार आहे.

**<><><><><>**

राज्यसभेचा आपला दीड वर्षांचा कार्यकाळ बाकी असून यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचं की नाही, याचा विचार करावा लागेल, असं सांगून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सक्रीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले आहेत. बारामती विधानसभा मतदारसंघातल्या शिर्सुफळ इथं इथले पक्षाचे विधानसभेचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. राजकारण फक्त निवडणूक आणि सत्तेसाठी नाही, तर लोकांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी करायचं असतं, असं सांगून या भागात विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

अमेरिकेच्या ४७व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या कमला हॅरिस यांच्यात लढत होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज संध्याकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत मतदानाला सुरुवात होईल; तर उद्या सकाळी साडेसात ते साडे नऊ यावेळेत ते संपेल. या दोघांनीही निवडणुकीत निर्णायक ठरणाऱ्या राज्यांमध्ये जोरदार प्रचार केला आहे. टपाली मतदानाने अनेकांनी आपलं मत आधीच नोंदवलं आहे. या निवडणुकीची मतमोजणी ६ जानेवारीला अमेरिकेच्या संयुक्त संसद अधिवेशनात होणार असून, तेव्हाच विजयी उमेदवाराची घोषणा करण्यात येईल. अमेरिकेच्या नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाळ २० जानेवारीपासून सुरू होत असून तो चार वर्षाचा असेल.

**<><><><>**

अंदमान-निकोबार द्वीप समूहांच्या प्रदेशात उद्यापर्यंत जोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तामिळनाडू, पुडुचेरी, करैकल,

केरळ, माहे आणि कर्नाटकच्या दक्षिण भागातही या आठवड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे.

राजधानी दिल्लीमध्ये पुढले २ ते ३ दिवस वातावरणात  धुरकं आणि काही प्रमाणात  धुकं राहील, तर उत्तरप्रदेशमध्ये तुरळक ठिकाणी मध्यम ते दाट स्वरूपाच्या धुक्याचा थर राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.